महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

जा.क्र.आस्था-१/पो.शि.भरती-२०१९/ 250 /२०२२
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी यांचे कार्यालय
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, रत्नागिरी ४१५ ६१२
दुरध्वनी क्र. ०२३५२-२२२२२२/२७१२५७ (का)
फॅक्स क्र. ०२३५२-२७१२५८
E-mail ID :- sp.ratnagiri@gmail.com
दिनांक :- 3 /०१/२०२२.

---

संदर्भ :- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११.

विषय :- पोलीस भरती-२०१९
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत....

--ooo--

**आदेश :-**

रत्नागिरी जिल्हा पोलीस घटकांत सन -२०१९ मध्ये रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदाकरिता पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणी मध्ये गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद पुरुष व महिला उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्र.६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील उमेदवारांना रत्नागिरी जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवर '' पोलीस शिपाई (गट-क)'' या संवर्गात सुधारित वेतन मॅट्रीक्स मधील वेतन स्तर एस-७ रुपये २१७००-६९१०० व विशेष वेतन रु.७५०/- (अधिक नियमानुसार वेतन व भत्ते) या वेतनावर पोलीस मुख्यालय, रत्नागिरी येथे दि.०४/०१/२०२२ पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती** करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | चेस्ट नं. | उमेदवाराचे नांव | लिंग | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण | बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२८५ | बळीराम बालाजी चौंडे | पुरुष | ईडब्ल्यूएस | ईडब्ल्यूएस | -- | ४३७ |
| २ | १००८ | सुजित मच्छिंद्र पवार | पुरुष | विजा-अ | विजा-अ | -- | ४३८ |
| ३ | ११६२ | प्रल्हाद तोलबा खोकले | पुरुष | अज | अज | -- | ४४८ |
| ४ | ११४३ | कृष्णा लालू चव्हाण | पुरुष | अजा | अजा | -- | ४५० |
| ५ | ११५५ | जगदीश सुरेश आंबवणे | पुरुष | अज | अज | -- | ४६२ |
| ६ | १११५ | सुभाष बाळु दोबाडे | पुरुष | अज | अज | -- | ४९२ |
| ७ | ११५३ | दिनकर नामदेव उघडा | पुरुष | अज | अज | -- | ४९४ |
| ८ | १५३९ | मनिषा मोरु वाघ | महिला | अज | अज | महिला | ४९९ |
| ९ | १५७९ | जयश्री तुळशीराम चव्हाण | महिला | विजा-अ | विजा-अ | महिला | ५०४ |
| १० | १५२१ | आश्विनी वाघजी भेंडेकर | महिला | अजा | अजा | महिला | ५१३ |
| ११ | १५८६ | पुष्पा आंबादास मौळे | महिला | अज | अज | महिला | ५१७ |
| १२ | १०४७ | योगेश बाबल्या जाधव | पुरुष | अजा | अजा | होमगार्ड | ५२७ |
| १३ | ११०१ | महेंद्र वसंत पारधी | पुरुष | अज | अज | होमगार्ड | ५३० |

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे** :-

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहिल.शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सुचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यांत येईल.

२. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहून निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहिल. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. संबंधीत जात पडताळणी समितीने उमेदवाराचे जात पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आत निकाली काढणेबाबत मा.उच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व तुमच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागाव व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यातील तरतुदीनुसार त्वरीत कारवाई करण्यांत येईल.

४. याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

५. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

६. पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological test) घेण्यांत येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल..

७. प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

८. प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. पोलीस दलामध्ये मुलभुत प्रशिक्षणानंतर त्यांची मोटार परिवहन विभाग, आयुधिक विभाग, मरिन विभाग वगैरे विभागामध्ये आवश्यकते प्रमाणे नेमणुक केली जाईल व ती त्यांच्यावर बंधनकारक राहिल.

९. प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकायांच्या पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

१०. रत्नागिरी जिल्हा पोलीस घटकाचे आस्थापनेवर नियुक्ती दिल्यानंतर, बेशिस्त/गैरवर्तन किंवा गंभीर स्वरुपाची कसुरी निदर्शनास आल्यास, त्यांची या घटकाचे कार्यक्षेत्राबाहेर इतर कोणत्याही घटकांत कोठेही व केव्हाही बदलीस पात्र होतील.

११. पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास, पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१२. ज्या संवर्गातून/जातीच्या प्रवर्गातुन पोलीस शिपाई पदी भरती झाली आहे तो संवर्ग/प्रवर्ग नंतर बदलता येणार नाही.

१३. पोलीस शिपाई पदावर रुजू झाल्या तारखेपासून तीन महिन्याचे आत उमेदवारांने महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि. क्र.सीआर-१०७९/२०५९/२२३/११, दिनांक २०.११.१९८० नुसार विहीत केलेले भत्ते व दायित्व (Assets and Liabilities) बाबतचे विवरणपत्र स्वतःहुन भरुन संबधीत आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

१४. शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना नविन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्ती योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सध्या अस्तीत्वात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना आपणांस लागू होणार नाही.

१५. शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/बारा, दिनांक २८.०३.२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील नियम ४ नमुना-अ नुसार हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ व तदूनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे सेवेत रहाण्यास अनर्ह ठरविण्यास पात्र ठरतील याची नोंद घ्यावी.

१६. महाराष्ट्र शासन, गृहविभाग पत्र क्र.पीएसबी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दिनांक २६.०९.२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, म.रा.मुंबई यांच्याकडील पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/प्रशि खर्च वसुली/ २०१२/२२३१, दि.२६.०४.२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायाने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून त्यांना प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेदवाराने जितक्या महिने प्रशिक्षण घेतले आहे त्या प्रशिक्षणाचा खर्च म्हणून प्रती महिना रुपये २०००/- (प्रती मासिक रुपये दोन हजार फक्त) इतका प्रशिक्षणावरील खर्च वसुल करण्यांत येईल, व सदरची रोख रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यांत येईल, याबाबतचे हमीपत्र देणे आपणांस बंधनकारक आहे.

१७. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली, १९५९ भाग-१ मधील नियम क्र.७८ (१) (v) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्यांत येईल.

१८. पोलीस शिपाई पदासाठी शासनाने विहीत केलेले मुलभूत पोलीस प्रशिक्षण संबंधीत पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पूर्ण करण्यास टाळाटाळ केल्यास, पोलीस प्रशिक्षणांत/प्रशिक्षण पुर्ण करण्यांत स्वारस्य न दाखविल्यास अथवा प्रशिक्षणांस गैरहजर राहिल्यास/भगोडा झाल्यास, महाराष्ट्र पोलीस नियमावली,१९९९ भाग-१ मधील नियम ७८ उपनियम (१) मधील viii खालील टिप नुसार तुमची सेवा समाप्त (Terminate from Service) करण्यांत येईल.

१९. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम - २०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदासाठी विहीत केलेले मुलभूत प्रशिक्षण पूर्ण करणे बंधनकारक राहील व सदर प्रशिक्षणांती घेण्यात येणारी परीक्षा ०४ संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर ०४ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

२०. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ या मुख्य नियमामधील नियम ३(१)(क) नंतर उपखंड (ड) समाविष्ठ करण्यांत आलेला असून, त्यानुसार अन्य अर्हता म्हणून पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणा-या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (L.M.V.) परवाना धारण करणे बंधनकारक राहील, परंतु सदर परवाना धारण न करणा-या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण करण्यात यावा. जर या कालावधीत हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास, पोलीस शिपाई पदासाठीचा निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यांत येईल.

२१. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ या मुख्य नियमामधील नियम-१२ नंतर नियम-१३ अंतर्भूत करण्यांत आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यांत येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

२२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.५/२००१/३९, दि.२०.०७.२००२ मधील तरतुदीनुसार नियुक्तीच्या दिनांकापासून ०१ वर्षाच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्य विहित प्रमाणपत्र सादर करावे. सदर विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न करणारा उमेदवार विहित प्रमाणपत्र सादर करेपर्यंत त्याची वेतनवाढ रोखण्यास पात्र राहिल.

२३. आपणास महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२४. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपायांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) १९५६, महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील विहीत केलेले अन्य नियम व तरतुदी बंधकारक राहतील.

२५. उमेदवारास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल. तसे करणे बंधनकारक राहील.

२६. नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा द्यावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी अर्ज करणेपूर्वी त्यानी या कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२७. पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाज्येष्ठता/२५१/२०१२, दिनांक १७/०८/२०१३ अन्वये स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यांत येईल.

२८. सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ व महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७ मधील तरतुदीनुसार घटक बदली नियमावली लागू राहील.

२९. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम ७४ नुसार नियुक्ती दिलेल्या महिला उमेदवार यांना कमीत कमी एक वर्षे सतत सेवा पूर्ण झाल्यानंतर प्रसुती रजेस पात्र राहतील.

३०. आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र खोटे असल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

३१. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/व्ही.आय.पी.६७/प्र.क्र.२०७/कार्या,१२ दि.२८.०५.२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, १९८२ मधील तरतूदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत संबंधीत उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यांत येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणा-या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

( डॉ.मोहित कुमार गर्ग )
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी.

प्रति,

वरील सर्व संबधित उमेदवार यांना

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

१) राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय रत्नागिरी

२/- सदरचे आदेश मुख्यालयाच्या नोटीस बोर्डावर त्वरीत डकविण्यात यावे. तसेच वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचा कर्तव्यावर हजर झाल्याचा दिनांक इकडील कार्यालयास कळविण्यात यावा. कर्तव्यावर हजर झालेनंतर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना किटपेटी व इतर सरकारी संरजाम अदा करावा.

२/- वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे स्टेट बँक ऑफ इंडीया, या बँकेत खाते उघडण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

२) प्रमुख लिपीक लेखा शाखा

२/- शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ अन्वये वर नमुद नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांची १ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने त्यांचे नवीन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना अंतर्गत विहीत नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्योवत. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना लवकरच मुलभुत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार असल्याने सदरची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी.

३) जिल्हा पोलीस दर्शनिका,

४) प्रभारी अधिकारी, सायबर शाखा, रत्नागिरी

२/- वरील प्रमाणे नियुक्ती आदेशाची समज सर्व उमेदवारांना फोनद्वारे तसेच एसएमएसद्वारे देवून त्यांना दि.०४/०१/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. पर्यत पोलीस मुख्यालय येथे हजर रहाण्याची समज दयावी.

# सूचनापत्र

## पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सुचना.

१) नियुक्ती दिलेल्या उमेदवारांनी मेस करीता रु.५०००/- ॲडव्हान्स भरणे आवश्यक असल्याने, सदरची रक्कम येताना बरोबर आणावी.

२) हजर होणा-या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा. गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, इतर साहित्य, बाड-बिस्तारा, जेवनासाठी ताट, वाटी, तांब्या तसेच बादली, मग वगैरे साहित्य बरोबर आणावे.

३) बँक खाते, डीसीसपीएस/एनपीएस खाते व सेवापट उघडणेसाठी 30x30 एमएम या साईजचे स्वतःचे ६ फोटो, मुळ पॅन कार्ड व आधार कार्ड सोबत आणावे.

—ooo—